सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक.एमआयएस-०५२६ / प्र. क्र.५६ / विशा -१ ब,दि. २१/०५/२०२६

**विषय**:- गोवशांची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एमआयएस -०५२६ / प्र. क्र.५६ / विशा -१ ब, दि. २१/०५/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०५२११४३२२७५९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 01-06-2026 18:00:48

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र १ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक-एमआयएस-०५२६/प्र.क्र. ५६/विशा-१ब**
**दुसरा मजला, मादाम कामा रोड,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :२१ मे, २०२६**

**प्रस्तावना:-**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४८ मधील तरतुदीनुसार गाई व वासरे, तसेच इतर दुभती जनावरे यांच्या जातींचे जतन करणे आणि त्यांच्या जाती सुधारणे, उपयुक्त जनावरांची (विशेषतः गाई व वासरे) कत्तल रोखण्यासाठी योग्य ती पावले उचलणे किंवा कायदे करणे यासाठी शासनाने प्रयत्न करणे अपेक्षित आहे. तसेच, राज्य शासनास विविध संघटनांकडून गो तस्करी, गोवंश जनावरांची अवैध वाहतूक, अनधिकृत कत्तलखाने इ. बाबत उचित कारवाई करण्याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होत असल्याने भारतीय संविधानातील तरतूद आणि शासनाच्या विविध कायदे व नियमांच्या अनुषंगाने; गोवंशाचे जतन, संरक्षण व संवर्धन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

वर प्रस्तावनेमध्ये नमूद विवेचनास अनुलक्षून गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६, प्राण्यांना निर्दयपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० तसेच, इतर आनुषंगिक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

२. संबंधित सर्व महानगरपालिका/ नगरपरिषदा / नगर पालिका / नगर पंचायती तसेच, सर्व जिल्हा परिषदा/ पंचायत समिती व ग्राम पंचायत यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत तथा विनापरवाना कत्तलखाने शोधून त्यांच्यावर नियमोचित कारवाई करावी. तसेच, कोणत्याही क्षेत्रात अनधिकृत तथा विनापरवना कत्तलखाने असणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. प्रचलित असलेले कायदे व नियम यांचा भंग करून वारंवार संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या व्यक्ती, टोळ्या अथवा संघटनांविरुद्ध संबंधित पोलीस यंत्रणेने प्रचलित नियमानुसार तपास करून महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत नियमोचित कारवाई करावी.

४. राज्यातील परिवहन/वाहतूक विभागाने उपरोक्त प्रमाणे अवैधरीत्या गोवंश वाहतूक करणा-या वाहनांची नियमित तपासणी करुन संबंधित वाहनांवर मोटार वाहन अधिनियम व इतर आनुषंगिक कायदयांनुसार नियमोचित कारवाई करावी.

५. राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक कार्यालये, पोलीस आयुक्तालये त्याचप्रमाणे पशुसंवर्धन आयुक्तालय व परिवहन आयुक्तालय यांनी आपल्या स्तरावरून स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करावेत. नियुक्त अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक सर्व संबंधित विभागांना आणि नागरिकांना उपलब्ध करून द्यावेत.

६. महाराष्ट्र राज्याच्या सीमावर्ती भागातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा, परिवहन कार्यालये, नागरी/ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, पशुसंवर्धन कार्यालये या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असलेली सीमा भागावर इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यामध्ये प्रवेशाच्या ठिकाणी संयुक्त तपासणी चौकी स्थापन करावी.

७. राज्यातील सर्व संबंधित विभागांनी संयुक्त भरारी पथके स्थापन करून अवैध गोवंश वाहतूक व बेकायदेशीर कत्तलखाने यांवर नियमोचित कारवाई करण्यात यावी.

८. गोवंशाचे जतन व संवर्धन प्रभावीपणे करण्यासाठी डायल ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर गो तस्करी, गोवंश जनावरांची अवैध वाहतूक, अनधिकृत कत्तलखाने याअनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित पोलीस यंत्रणेने उक्त तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करावी.

९. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ४०३(२) अन्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाकडून धार्मिक कारणास्तव तात्पुरते पशुवधगृह स्थापन करण्यास लेखी परवानगी दिल्यानंतर पशुवधगृहाची स्वच्छता ठेवणे, जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेसंबंधी सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे परवानाधारकांवर बंधनकारक राहील.

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलीस आयुक्तालय क्षेत्र वगळून इतर ठिकाणी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच, पोलीस आयुक्तालय क्षेत्रात संबंधित पोलीस आयुक्त यांची राहील. संबंधित जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त यांनी उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने नियमित आढावा घ्यावा व सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०५२११४३२२७५९२९ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRITAMKUMAR VASANTRAO JAWALE
Date: 2026.05.21 14:34:46 +05'30'

**( प्रितमकुमार जावळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क,अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे सचिव, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत आपल्या अधीनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांना अवगत करावे.
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी.
१०) आयुक्त, परिवहन आयुक्तालय, मुंबई.
११) आयुक्त, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे.
१२) सर्व महानगरपालिका आयुक्त/मुख्याधिकारी नगरपरिषद
१३) सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक/पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक.
१४)सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी .
१५)मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१६)निवडनस्ती विशा-१ब.